# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

## लेखा व वित्त विभाग

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in E-mail – account@pcmcindia.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक.क्र.लेखा/२९/कावि/२६७/२०२३ दिनांक :- ९ /१०/२०२३

## परिपत्रक

विषय :- प्रशासकीय मान्यता देताना घ्यावयाची दक्षता बाबत..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात विविध विकास कामांच्या योजना व प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात प्रशासकीय मान्यता मा.महापालिका सभेमार्फत दिल्या जातात. सदर प्रशासकीय मान्यता दिलेले प्रकल्प हे एक वर्षापेक्षा जास्त वर्षाच्या कालावधीमध्ये चालु राहतात. त्यामुळे सदर चालु प्रकल्पांना योग्य वेळी निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. अन्यथा निधी अभावी प्रकल्पांची किंमत वाढुन वित्तीय दायित्व निर्माण होऊ शकते. याबाबत लोकलेखा समितीने देखील योग्य ती दक्षता घेणेबाबत आदेशीत केले असुन, चालु वर्षात व आगामी वर्षात उपलब्ध होणारा निधी, प्रकल्पाकरिता आवश्यक निधी व सध्या उपलब्ध निधी याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे.

**सबब, याकरिता परिपत्रक पारित करण्यात येत आहे की, सर्व विभागांनी निविदा प्रसिध्दीपुर्वी सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार दायित्वाबाबतची सर्व माहिती भरून नस्ती मान्यतेसाठी मा.आयुक्त / अतिरिक्त आयुक्त यांचेकडे सादर करावी.**

वरील परिपत्रकाची तातडीने अंमलबजावणी करणेकामी विभागप्रमुखांनी गंभीरतेने दक्षता घ्यावी.

( शेखर सिंह )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रति:- सर्व संबंधित विभागप्रमुख

# परिशिष्ट

१) विभागाचे नाव ........................................ कामाचे नाव ...............................................

२) सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सन .........................च्या दर सुचीवर आधारित र.रू...................................इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

३) सदर अंदाजपत्रकाची तांत्रिक तपासणी शहर अभियंता / सह शहर अभियंता / कार्यकारी अभियंता यांनी केली असुन त्यानुसार पत्र क्र.................................................दि........................ अन्वये र.रू.............................................इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे.

४) सदर कामासाठी आवश्यक असणारी तरतूद / खर्च सन.............................. चे अंदाजपत्रकातील पान क्र..................... अनु.क्र............. लेखाशिर्ष .................................... या उपलब्ध असलेल्या तरतूदीमधुन करण्यात येणार आहे.

५) सदर कामाची सुरूवात सन ................................ या आर्थिक वर्षापासुन करण्यात येणार आहे.

६) प्रस्तावित कामाच्या मुदतीनुसार वर्षनिहाय खर्चाचे नियोजन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | एकुण अपेक्षित खर्च | काम पुर्ण होण्याचा कालावधी ( वर्ष ) | चालु वर्षात अपेक्षित खर्च | मुदतीनुसार वर्षनिहाय आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७) सदर लेखाशिर्षावर सदर धारिकेसह निर्माण होणार एकुण दायित्व र.रू..................... व त्यापैकी चालु वर्षामध्ये अंदाजपत्रकात केलेली तरतुद र.रू..............................

विभाग प्रमुखाची स्वाक्षरी